ठाणे, बुधवार दि. २१ ऑक्टोबर २०२६ वर्ष : १५, अंक : १७४, पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

दैनिक महाराष्ट्र सम्राट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

मुख्य संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**सत्तेची दडपशाही**

दिल्लीतील तरुणांचे आंदोलन रोखण्यासाठी पोलिसी बळाचा वापर, सार्वजनिक वाहतुकीवरील निर्बंध आणि मतदारयाद्यांतील वाद हे नेमके कशाचे लक्षण आहे ? सत्ताधार्यांनी लोकशाहीचा कारभार करायचा की .... पान २ वर

# आम्ही केवळ भाषण ठोकणारे नाही, तर शेतकऱ्यांच्या घरात राशन देणारे आहोत

**मुंबई : गोरेगाव येथील नेस्को मैदानावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा दसरा मेळावा झाला . राज्यातील आगामी राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर होत असलेल्या या मेळाव्याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागलं आहे. मैदानावर शिवसैनिकांनी प्रचंड गर्दी केली असून, संपूर्ण परिसर भगवामय झाला होता.** (पान 2 वर )

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विरोधकांवर घणाघात



"गेल्या वर्षी राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचं अतोनात नुकसान झालं. पिके नष्ट झाली, ढोर-जनावरे वाहून गेली. अशा कठीण काळात आमचे संपूर्ण मंत्रिमंडळ वातानुकूलित कक्षात न बसता थेट शेतकऱ्यांच्या बांधावर गेले", अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सरकार शेतकऱ्यांच्या सुख-दुःखात सोबत असल्याचा पुनरुच्चार केला. नेस्को मैदानावरील दसरा मेळाव्यात शिवसैनिकांना संबोधित करताना ते म्हणाले की, "संकटात सापडलेल्या बळीराजाची दिवाळी गोड व्हावी म्हणून आमच्या सरकारनं तातडीने मदत पोहोचवली. एकनाथ शिंदे आणि संपूर्ण शिवसेना शेतकऱ्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभी आहे. यंदाच्या दिवाळीतही आम्ही शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत देण्याचं काम करू." विरोधकांच्या टीकेला उत्तर देताना त्यांनी सुनावलं की, "आम्ही कोणत्याही निरर्थक आरोपांना उत्तर देणार नाही, तर आमच्या कामातूनच चोख उत्तर देऊ. आम्ही केवळ रिकामी भाषणे देणारे नाही, तर गरिबांना राशन देणारे आणि त्यांच्या घरची चूल पेटवणारे कार्यकर्ते आहोत.

### उपमुख्यमंत्र्यांचा उद्धव ठाकरेंना सवाल

"राज्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यानंतर आमच्या सरकारनं तातडीनं दुष्काळ जाहीर केला. शेतकऱ्यांची सक्तीची कर्ज वसुली थांबवून वीज आणि पाणी बिल माफ करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला", असं सांगत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सरकार बळीराजाच्या पाठीशी खंबीरपणे उभं असल्याचं स्पष्ट केलं. विरोधकांच्या टीकेचा समाचार घेताना आणि ठाकरेंना सवाल करताना ते म्हणाले, "आम्ही शेतकऱ्यांची दिवाळी काळी होऊ देणार नाही, हा शब्द पाळत त्यांना 5 हजार रुपयांची मदत देण्याचा निर्णय घेतला. मी स्वतः मुख्यमंत्री असताना एनडीआरएफचे कडक निकष बाजूला ठेवून शेतकऱ्यांना भरघोस मदत केली होती. आज आमच्या सरकारमुळे शेतकऱ्यांना वर्षाला 12000 रुपये मिळत आहेत. तुम्ही मुख्यमंत्री असताना शेतकऱ्यांसाठी काय केलं? कोणत्या तोंडानं तुम्ही आमच्यावर आरोप करता?"

- 'वोटचोरी'च्या आरोपांवरून टीका
- "हा बांगलादेश किंवा श्रीलंका नाही, हा हिंदुस्थान आहे"
- देशद्रोहींना धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही, तरुणांची माथी भडकवू नका
- विरोधी पक्षांची 'इंडी' आघाडी म्हणजे १० तोंडांचा रावण

# कितीही दरोडेखोर आले तरी आमचा भगवा कोणीही चोरू शकत नाही

## उद्धव ठाकरेंचा हुंकार

**शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथून दसरा मेळाव्यात शिवसैनिकांना संबोधित केले. राज्याच्या कान्याकोपऱ्यातून शिवसैनिक विचारांचे सोने लुटण्यासाठी शिवतीर्थावर जमले होते. ठाकरे गटाकडून यंदाचा दसरा मेळावा संविधानाच्या संरक्षणासाठी असल्याचं सांगण्यात आलं. उद्धव ठाकरेंनीही यावेळी जमलेल्या सर्व शिवसैनिक माता भगिनींना अभिवादन केले. ते यावेळी म्हणाले," आजच दृश्य पाहात बसावं असं आहे. मला आधीचे दिवस आठवले. सगळीकडे भगवा माहोल. हाच भगवा आपल्याला लाल किल्यावर फडकवायचा आहे. हीच आपली ओळख आहे. हाच पवित्र भगवा शिवाजी महाराजांनी घेतला होता. कितीही दरोडेखोर येउदेत, पण आपला भगवा ते चोरू शकत नाहीत."**

आजचा मेळावा विशेष आहे. शिवसेनाप्रमुखांचा जन्मशताब्दी वर्ष आहे. शिवसेनेच्या दसऱ्या मेळाव्याचे हे हिरक महोत्सवी वर्ष आहे. शिवसेनाप्रमुखांविषयी खूप जणांनी बोललं आहे पण आज मला त्यांची काही वाक्य आठवतात. "मेलेली मन कधीच क्रांती करू शकत नाहीत, जिवंत माणसासारखे वागा. मुडद्यासारखे कदापि वागू नका. क्रांती ही मर्दांची असते तर शांती हि मुडद्यांची असते. आपण मर्द आहोत पण मला हेच सांगायचंय की खुराडातल्या कोंबड्यासारखं जगू नका. 100 दिवस शेळी होऊन जगण्यापेक्षा एकाच दिवस वाघ बनून जगा." **(पान 2 वर )**

- महाराष्ट्राला शहरी नक्षलवाद म्हणताना जीभ झडत कशी नाही?
- दुष्काळावरून सरकारला घेरलं




### 'न्यायालयापासून पोलिसांपर्यंत न्याय मिळत नसेल, तर तरुण रस्त्यावर उतरणारच'

सोन्याविषयीच्या विधानावर आणि आंदोलनांवर बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, दशम्याच्या दिवशी सोनं लुटायचं सांगणे हा एक सांस्कृतिक संकेत आहे, ज्याचा अर्थ 'सोन्यासारखे राहा' असा होतो. पण आपले पंतप्रधान सांगतात की सोनं खरेदी करू नका! आजची स्थिती अशी झाली आहे की सकाळी उठून साडेतीन मुहूर्त पाहायचे आणि न्यायाची भीक मागायची. पण न्यायव्यवस्था, सरकार आणि पोलीस कोठेही न्याय मिळत नसेल, आणि जनता चिडून रस्त्यावर उतरली, की लगेच त्यांना 'नक्षलवाद' ठरवले जाते. सरसंघचालक मोहन भागवत म्हणतात की आंदोलनामध्ये सभ्यता हवी, पण लोकांच्या अधिकारांची पायमल्ली होत असताना हा असंतोष असाच उसळणार!"

### जर घात झाला असता तर कोणत्या तोंडाने टिमकी वाजवली असती?; उद्धव ठाकरे यांचा सरकारवर प्रहार

टायगर श्रॉफवरील हल्ल्याच्या घटनेवर बोलताना उद्धव ठाकरे संताप व्यक्त करत म्हणाले, "टायगर श्रॉफवर हल्ला झाला आणि हा 'चमको' नेता लगेच तिथे पळत गेला. पोलिसांनी तत्परता दाखवून आरोपी पकडले, याचे कौतुक करायचे का आणखीन काय करायचं? सुदैवाने तो तरुण (पोरगा) वाचला. कसल्या पद्धतीचे सरकार चालवता तुम्ही? पोलीस आणि इतर यंत्रणांनी बाकी सगळी कामे केली आहेत, पण गुन्हेगारी रोखण्यात अपयशी ठरले आहेत. तुमच्या नाकाबंद्या कशासाठी असतात? आमच्याकडे साधा वाद झाला की पोलीस लगेच हजर होतात, मग हे उघडपणे शस्त्र घेऊन आलेले लोक पोलिसांना दिसत नाहीत का? हे राज्यात शस्त्र घेऊन आले कसे? तुम्ही आरोपींना पकडले हे मान्य, पण जर एखादा मोठा घात झाला असता, तर कोणत्या तोंडाने तुम्ही यशाची टिमकी वाजवली असती? ते शस्त्र घेऊन आले तेव्हाच यंत्रणेला कळायला हवे होते आणि तेव्हाच त्यांना जागेवर रोखायला हवे होते. कुणालाच कसली लाज-लज्जा उरलेली नाही."



# आम्ही केवळ भाषण ठोकणारे नाही, तर शेतकऱ्यांच्या घरात राशन देणारे आहोत

**(पान 1 वरून ) 'वोटचोरी'च्या आरोपांवरून टीका -** दिल्ली दौऱ्याचा संदर्भ देत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुढे म्हणाले, "मी दिल्लीला जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. त्यांच्यासमोर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या मदतीचा प्रस्ताव आणि सद्यस्थिती मांडली. मुख्यमंत्र्यांनीही वस्तुस्थिती त्यांच्या कानावर घातली. त्यावर 'चिंता करू नका, केंद्र सरकार महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे' असं आश्वासन पंतप्रधान मोदी आणि अमित शाह यांनी दिलं आहे." शेतकऱ्यांच्या दुःखाचं राजकारण करणाऱ्या विरोधकांना लक्ष्य करत ते म्हणाले, "पिके करपून गेली असताना हे लोक मोर्चे काढत आहेत. हे पाप कुठे फेडणार? आमच्यावर वोटचोरीचा आरोप करता? पण खरी वोटचोरी तेव्हा झाली जेव्हा जनतेने तुम्हाला भाजपासोबत युती म्हणून मतदान केलं आणि तुम्ही मतदारांशी गद्दारी करून काँग्रेससोबत गेलात!"

**"हा बांगलादेश किंवा श्रीलंका नाही, हा हिंदुस्थान आहे" -** विरोधकांकडून सर्वोच्च न्यायालयावर आणि निवडणूक आयोगावर केल्या जाणाऱ्या टीकेचा समाचार घेताना एकनाथ शिंदे कडाडले, "हे लोक भारताच्या सर्वोच्च न्यायालयावर आणि संविधानिक संस्थांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. तुम्हाला संविधानिक संस्थांवर बोलण्याचा अधिकार तरी आहे का? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे केवळ नाव घ्यायचे आणि त्यांनी दिलेल्या संविधानाची आणि लोकशाहीची हत्या करायची, हेच तुमचे उद्योग सुरू आहेत. आज मतदार याद्या स्वच्छ करण्याचे काम सुरू असताना यांचे सोयीचं दुटप्पी राजकारण समोर आलं आहे." देश जाळण्याच्या वक्तव्यांचा कडक शब्दांत निषेध करत त्यांनी ठणकावून सांगितलं की, "देश जाळण्याच्या गोष्टी करू नका. लक्षात ठेवा, हा बांगलादेश नाही, श्रीलंका नाही, हा हिंदुस्थान आहे!"

**"देशद्रोहींना धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही, तरुणांची माथी भडकवू नका" -** "देशाच्या संरक्षणाशी आणि अस्मितेशी खेळणाऱ्या देशद्रोहींना धडा शिकवल्याशिवाय आम्ही राहणार नाही," असा संतप्त इशारा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नेस्को मैदानावरील दसरा मेळाव्यातून दिला. विरोधकांकडून तरुणांची दिशाभूल केली जात असल्याचा आरोप करत ते म्हणाले, "भारत हा जगातील सर्वात तरुण देश आहे. तरुणांची माथी भडकवून देशात अराजकता माजविण्यापेक्षा, त्यांना विकासाच्या मार्गावर पुढे नेले पाहिजे, त्यांचा उत्कर्ष साधला पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच नेमकं काम करत असून ते देशातील तरुण पिढीला प्रगतीसाठी उत्तम मार्गदर्शन करत आहेत." आपल्या कामाचा दाखला देताना शिंदे म्हणाले की, "मी जेव्हा गडचिरोलीचा पालकमंत्री होतो, तेव्हा नक्षलग्रस्त भागात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करून तेथील 5000 तरुणांना मुख्य प्रवाहात आणलं आणि त्यांना रोजगार मिळवून दिला."

**'संविधान संपलं' हा फेक नरेटिव्ह पसरवू नका - शिंदे -** विरोधकांच्या मोर्चांवर आणि 'संविधान धोक्यात' असल्याच्या दाव्यांवरून टोला लगावत उपमुख्यमंत्री पुढे म्हणाले, "आज विरोधक खुलेआम मोर्चे काढत आहेत. हीच खरी लोकशाही आहे, कारण तुमचे सर्व अधिकार या देशात सुरक्षित आणि आबाधित आहेत. मात्र, तरीही 'संविधान संपलं, लोकशाही संपली' असा खोटा आणि फेक नरेटिव्ह पसरवला जात आहे. जनतेनं या खोट्या प्रचाराला अजिबात बळी पडू नये. जे स्वतः खरी वोटचोरी करून सत्तेवर आले होते, तेच आज आमच्यावर खोटे आरोप करत आहेत. पण जनता सुजाण आहे, ती खोटे आरोप करणाऱ्यांना कधीही माफ करणार नाही." केंद्र आणि राज्य सरकारच्या कल्याणकारी योजनांचा गौरव करत त्यांनी सांगितलं की, "आज देशातील 25 कोटी लोकांना मोफत अन्नधान्य देण्याचं ऐतिहासिक काम महायुती सरकार करत आहे. आम्ही सदैव गरिबांच्या कल्याणासाठी कटिबद्ध आहोत."

**"विरोधी पक्षांची 'इंडी' आघाडी म्हणजे १० तोंडांचा रावण" -** "दिल्लीचा पप्पू काँग्रेस नेते राहुल गांधी देशाच्या सर्वोच्च न्यायालयावर मोर्चा घेऊन गेले. हा भारताच्या सर्वोच्च न्यायव्यवस्थेचा आणि कायदेतज्ज्ञांचा घोर अपमान आहे", अशा कडक शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांचा समाचार घेतला. नेस्को मैदानावरील दसरा मेळाव्यात बोलताना ते पुढे म्हणाले, "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अत्यंत विचारपूर्वक या देशात स्वायत्त आणि मजबूत संविधानिक संस्था उभ्या केल्या. मात्र, आज तुम्ही त्याच संस्थांवर हल्ले करायला निघालात. प्रत्येक घटनात्मक संस्थेवर आमचीच माणसे असायला पाहिजेत किंवा प्रत्येक गोष्ट तुमच्या सोयीनुसार व्हायला पाहिजे, अशी तुमची हुकूमशाही वृत्ती आहे. पण मला सांगा, तुम्ही स्वतः कुठे निवडून येऊन मुख्यमंत्री झाला होता?" 2019 च्या विधानसभा निवडणुकीनंतर घडलेल्या राजकीय घडामोडींवरून उद्धव ठाकरेंवर प्रहार करताना उपमुख्यमंत्री म्हणाले, "2019मध्ये महाराष्ट्रातील जनतेने महायुतीला स्पष्ट कौल दिला होता. मात्र, तुम्ही केवळ सत्तेच्या मोहापायी त्या युतीशी आणि मतदारांच्या विश्वासाशी गद्दारी केली. ही केवळ साधी वोटचोरी नव्हती, तर तो मतदारांच्या कौलावर टाकलेला 'वोट दरोडा' होता! आज तुम्ही जी दुटप्पी भूमिका घेऊन काम करत आहात, ती पाहता ही विरोधी पक्षांची 'इंडी' (INDI) आघाडी म्हणजे 10 तोंडांचा रावण आहे. या रावणाच्या मांडीला मांडी लावून तुम्हाला संविधानाची हत्या करायची आहे का?" असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला.

**"पंतप्रधानांचा अपमान करणाऱ्या देशद्रोहींना १४० कोटी जनता माफ करणार नाही" -** देशाच्या वाढत्या आर्थिक ताकदीचा गौरव करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचे कौतुक केलं. ते म्हणाले, "ज्या पंतप्रधानांनी भारताला जागतिक अर्थव्यवस्थेत 14व्या क्रमांकावरून थेट 5व्या क्रमांकावर (आणि आता चौथ्या क्रमांकाच्या दिशेनं) आणून ठेवलं, त्या देशाला पुढे नेणाऱ्या प्रधानमंत्र्यांबद्दल तुम्ही अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन बोलता? पंतप्रधानांबद्दल तुम्ही जी भाषा वापरत आहात, त्यासाठी या देशातील 140 कोटी जनता तुम्हाला कधीही माफ करणार नाही." हा पाकिस्तान नसून हिंदुस्थान आहे, याची आठवण करून देत त्यांनी ठणकावून सांगितलं, "देशातील देशप्रेमी आणि राष्ट्रप्रेमी जनता या सर्व देशद्रोहींना आणि विकासविरोधी शक्तींना निवडणुकीच्या माध्यमातून चोख धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही."

# कितीही दरोडेखोर आले तरी आमचा भगवा....

**(पान 1 वरून ) महाराष्ट्राला शहरी नक्षलवाद म्हणताना जीभ झडत कशी नाही? -** आंदोलन करणाऱ्या तरुणांवर आणि विद्यार्थ्यांवर 'शहरी नक्षलवाद' असल्याचा शिक्का मारल्याबद्दल ठाकरे संतापले. ते म्हणाले, "छत्रपती शिवरायांच्या या महाराष्ट्राला शहरी नक्षलवाद बोलताना तुमची जीभ झडत कशी नाही? महाराष्ट्राच्या या गौरवशाली परंपरेला कलंक लावण्याचे काम मुख्यमंत्री करत आहेत. मला सांगा, हे शहरी नक्षलवाद म्हणजे नेमकं काय? ही मुलं रस्त्यावर कशासाठी उतरत आहेत?" पंतप्रधान मोदींच्या कारभारावर टीका करत ते म्हणाले की, ही मुलं हातात तिरंगा घेऊन न्यायासाठी रस्त्यावर जातात, पण त्यांना अडवले जाते. भागवतांना माझा सवाल, स्वातंत्र्यानंतर मुख्यालयावर तिरंगा का फडकावत नव्हता? - संघप्रमुख मोहन भागवत यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत उद्धव ठाकरे म्हणाले, "माझं सरसंघचालक भागवत यांच्याशी काही व्यक्तिगत भांडण नाही, पण आज मला त्यांना विचारायचं आहे की, देश स्वतंत्र झाल्यानंतर तुम्ही नागपूरच्या मुख्यालयावर इतकी वर्षे तिरंगा का फडकावत नव्हता?"

**'सोनं लुटायला सांगितलं तर पंतप्रधान म्हणतात सोनं खरेदी करू नका' -** दसरा सणाच्या परंपरेवर बोट ठेवताना ठाकरे म्हणाले, "दशम्याच्या दिवशी आपण सोनं लुटायचं सांगतो, तो एक सांस्कृतिक संकेत आहे. 'सोनं घ्या आणि सोन्यासारखे राहा' असा यामागचा संदेश असतो. पण दुसरीकडे देशाचे पंतप्रधान म्हणतात की सोनं खरेदी करू नका!" तसेच, राज्यातील निवडणुका आणि राजकीय स्थितीवर टीका करताना त्यांनी, "जिथं आमची मतेच लुटली जातात, तिकडे आता दुसरं काय लुटायचं बाकी ठेवलंय तुम्ही?" असा सवाल करत सत्ताधाऱ्यांच्या धोरणांवर तीव्र शब्दांत रोष व्यक्त केला.

**दुष्काळावरून सरकारला घेरलं -** "हा दुष्काळ मोठा असणार आहे. आपल्याकडे दुष्काळात तेरावा महिना अशी म्हण आहे. तसंच हे सरकार आहे. डबल इंजिनचं सरकार नुसतं घोषणा करतंय. गेल्यावर्षी अतिवृष्टीत सगळं वाहवून गेलं होत. तेव्हा मुख्यमंत्र्यांनी इतिहासातील सर्वात मोठं 31 हजार कोटींचं पॅकेज जाहीर केलं होत. ज्यांची जमीन खरडून गेलीये त्यांना साडेतीन लाख रुपये हेक्टरी जाहीर केले. ते किती जणांना मिळाले? पीकविमा किती जणांना मिळाला? आतासुद्धा जी 5 हजाराची मदत केली ते उपकार नाहीत? विम्यासाठी जे निकष लावले होते ते निकषच काढून टाकले जेणेकरून नुकसानभरपाई देण्याची गरजच पडणार नाही. कर्जमाफी जाहीर झाली पण कुणाला मिळाले काहीच माहित नाही? केंद्रीय पथक येऊन गेलं काय केलं कुणालाच माहीत नाही..."

**शेतकऱ्यांच्या तोंडावर ५ हजारांची मदत फेकताय; -** पिकविमा आणि कर्जमाफीवरून उद्धव ठाकरेंचा राज्य सरकारवर संताप शिवाजी पार्कावरील दसरा मेळाव्यात बोलताना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी राज्यातील शेतकरी वर्गाच्या दयनीय स्थितीवरून सरकारला तीव्र शब्दांत धारेवर धरले. नुकत्याच दिलेल्या पाच हजार रुपयांच्या मदतीवर बोट ठेवत, हे उपकार नाही तर शेतकऱ्यांची चेष्टा चालवली आहे, असा घणाघात त्यांनी केला. पिकांचे पंचनामे, रखडलेली कर्जमाफी, अपूर्ण नमो किसान योजना आणि कागदावरच फिरणाऱ्या केंद्रीय पथकावरून सरकार शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. Uddhav Thackeray Dasara Melava Live Speech : कितीही दरोडेखोर आले तरी आमचा भगवा कोणीही चोरू शकत नाही; उद्धव ठाकरेंचा हुंकार फक्त महाराष्ट्रातच नव्हे, तर दिल्लीच्या लाल किल्ल्यावरही हाच भगवा फडकवण्याचा संकल्प उद्धव ठाकरे यांनी दसरा मेळाव्यात बोलताना व्यक्त केला. कितीही दरोडेखोर आले तरी आमचा भगवा कोणीही चोरू शकत नाही, असा ठाम विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच, राज्यावर ओढवलेले दुष्काळाचे संकट अतिशय आक्राळ-विक्राळ रूप धारण करणार असल्याचा इशारा देत त्यांनी सत्ताधाऱ्यांवर कडाडून टीका केली.

# आम्ही संख्याबळ वाढवणार, एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री करणार



## दसरा मेळाव्याआधी प्रताप सरनाईकांचा फटाका

शिवसेनेचा आज मुंबईतील नेस्को सेंटरवर दसरा मेळावा होणार आहे. त्याआधी मंत्री आणि शिंदेंच्या शिवसेनेचे नेते प्रताप सरनाईक यांनी मोठं विधान केलं आहे. ऐन दसऱ्याला प्रताप सरनाईकांनी राजकीय फटाका फोडला आहे.

प्रत्येक शिवसैनिकाला वाटतं की एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री व्हावे. प्रताप सरनाईक, आनंद परांजपे आणि सर्वसामान्य शिवसैनिकांना वाटतं शिंदे साहेबांनी परत मुख्यमंत्री व्हावं. परंतु संख्याबळाचा विचार करावा लागतो, असं प्रताप सरनाईक म्हणाले. आज आमच्याकडे संख्याबळ नसल्यामुळे एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री आहेत. त्यामुळे आगामी विधानसभेच्या निवडणुकीत आम्ही संख्याबळ वाढवून एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री करु...एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत ही जनतेची इच्छा आहे, असंही प्रताप सरनाईक म्हणाले. तर एकनाथ शिंदेंना संख्याबळाची वाट पाहायची आवश्यकता नाही, ते आताही मुख्यमंत्री होऊ शकतात, असं विधान शिंदेंच्या शिवसेनेचे नेते सचिन अहिर यांनी केलं आहे.

## शिवसैनिकांनी संकटग्रस्त शेतकऱ्यांना मदत करावी- एकनाथ शिंदे

दसरा मेळाव्याला राज्याच्या कानाकोपऱ्यातून शिवसैनिक आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने मुंबईत येत असतात, मात्र यंदाची दुष्काळी परिस्थिती पाहता मुंबईत येण्याऐवजी दुष्काळग्रस्त भागातील शिवसैनिकांनी संकटग्रस्त शेतकऱ्यांना मदत करावी. शेतकऱ्याच्या घरी जाऊन त्याच्या दारी मदतीचे तोरण लावावे तर दसरा मेळाव्यासाठी मुंबई आणि परिसरातील शिवसैनिक आणि पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन पक्षाकडून करण्यात आले आहे. दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबातील महिलांना उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध व्हावे, यासाठी शिलाई मशीनचे वाटप करण्यात येत असून, दुष्काळग्रस्त भागांतील शेतकऱ्यांच्या मुलींच्या विवाहासाठीही शिवसेनेच्या वतीने मदत करण्यात येणार आहे. दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांना मदतीचा हात देण्याचे आवाहन केल्यानंतर शिवसेनेच्या स्थानिक नगरसेवकांनी, पदाधिकाऱ्यांनी तसेच विविध क्षेत्रांतील अनेक मान्यवरांनी पुढाकार घेत शेतकऱ्यांसाठी मदतनिधीचे धनादेश उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे सुपूर्द केले.

# 'आंदोलनानं समस्या सुटणं सोपं नाही, काही अतिमहत्वकांक्षी लोक समाजविघातकांना पाठिंबा देतायत'

## विजयादशमी सोहळ्यातून मोहन भागवतांचं मोठं विधान, रिजीम चेंजवरही भाष्य




पाश्चिमात्य जगातून एक वादळ उठलं आहे, ते विश्वातील सभ्यता, मांगल्य, सांस्कृतिक मूल्ये आणि मानवी संस्कार नष्ट-भ्रष्ट करू पाहत आहे. त्यासाठीच ते वादळ घोंघावत आहे. फ्रान्स, अल्बेनिया सारख्या अनेक देशांमध्ये हे सर्व घडत आहे. रेजीम चेंज केल्याने परिस्थिती बदलेल, असे अनेकांना वाटत आहे. मात्र पूर्वीही असे घडलेले नाही आणि पुढेही होणार नाही. रेजिम चेंज केल्याने परिस्थिती बदलत नाही. आसुरी ताकत भारताविरुद्ध कार्य करत आहे. भारत मोठा झाला, तर त्या आसुरी शक्तींच्या हेतूंना बाधा पोहोचवेल, म्हणून भारतही या वादळाचं लक्ष ठरलं आहे. ते भारत तोडण्यासाठी उत्सुक आहेत. त्यांना काही लोकांची साथ असते, तर काही अति महत्वकांक्षी नेतेही त्यांना भेटतात. मात्र, लोकशाहीमध्ये आंदोलन होतीलच. पण तसे होत असताना त्यांचा उद्देश काय असायला हवा? आंदोलनाचा उद्देश समस्यांचा समाधान असला पाहिजे.असं महत्वपूर्ण विधान सरसंघचालक मोहन भागवत यांनी केलं आहे. नागपुरातीलराष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विजयादशमी सोहळ्यात ते बोलत होते. आंदोलनातून समस्येचं समाधान होणार नाही, तर समाजाच्या सक्रिय सहभागातूनही समस्यांचे निराकरण होऊ शकते, असेही ते म्हणाले.

### आपला समाज आंदोलनांच्या कचाट्यात सापडू नये, आंदोलनाचा उद्देश दुसराच असेल तर...

आंदोलनामुळं देश आणि समाजात फूट पडू नये, राज्यघटनेच्या मर्यादेत आंदोलनं झाली पाहिजे हे नेत्यांनी लक्षात घ्यावं. आपला समाज ह्या आंदोलनांच्या कचाट्यात सापडू नये. आंदोलनानं समस्या सुटणं सोपं नाही. समाजाची सक्रीयता आणि परस्पर संवाद वाढला पाहिजे.समाज आणि देश चालवण्याची आमचीही जबाबदारी आहे. आंदोलनाचा उद्देश दुसराच असेल तर ते राजकीय होतं. आंदोलनामुळं शत्रू भाव वाढतो. आंदोलनांचा लाभ देशविरोधी शक्ती घेऊ शकतात. असेही सरसंघचालक मोहन भागवत म्हणाले.

### भारताने अधिक सजग राहण्याची आवश्यकता

संघाच्या विजयादशमी उत्सवात पुढे बोलताना सरसंघचालक मोहन भागवत यांनी जागतिक परिस्थिती, भारतासमोरील आव्हाने, आंदोलनांचे उद्देश आणि समाजाच्या एकतेचे महत्त्व यावर भाष्य केले. पाश्चिमात्य जगातून सभ्यता, मांगल्य, सांस्कृतिक मूल्ये आणि मानवी संस्कार नष्ट-भ्रष्ट करणारे वादळ घोंघावत असल्याचे सांगत भागवत म्हणाले की, फ्रान्स आणि अल्बेनियासारख्या अनेक देशांमध्ये अशा घडामोडी दिसून येत आहेत. या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारताने अधिक सजग राहण्याची आवश्यकता आहे. लोकशाहीमध्ये आंदोलने होणारच, मात्र आंदोलनांचा उद्देश समस्यांचे निराकरण हा असला पाहिजे, असे भागवत यांनी स्पष्ट केले. केवळ आंदोलन करून समस्यांचे निराकरण होईलच असे नाही. समाजाच्या सक्रिय सहभागातूनही अनेक समस्यांवर उपाय शोधता येऊ शकतात, असे त्यांनी नमूद केले.

### विकासाच्या संकल्पनेवर पुनर्विचार करण्याची गरज

नेपाळमध्ये आलेल्या नैसर्गिक संकटाचा उल्लेख करताना त्यांनी विकासाच्या संकल्पनेवर पुनर्विचार करण्याची गरज व्यक्त केली. संपूर्ण हिमालयीन क्षेत्रात अशा संकटांची पुनरावृत्ती होत असताना विकास प्रक्रियेकडे योग्य दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे. विकासाच्या नावाखाली अशी परिस्थिती निर्माण होऊ नये की, त्याची किंमत मानवी अस्तित्वालाच मोजावी लागेल, असा इशाराही त्यांनी दिला.

### सर्व भारतीयांनी एक असल्याची भावना जपली पाहिजे

भारताची एकता आणि सामर्थ्य यावर भर देताना भागवत म्हणाले की, हिंदू दृष्टिकोनात विशिष्ट पूजा पद्धती, खानपान, राहणीमान किंवा सामाजिक-राजकीय विचारांचे बंधन नाही. सर्व भारतीयांनी एक असल्याची भावना जपली पाहिजे. देश आपल्याला काय देतो, यापलीकडे जाऊन आपण देशासाठी काय करू शकतो, याचा विचार महत्त्वाचा आहे.

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## सत्तेची दडपशाही

दिल्लीतील तरुणांचे आंदोलन रोखण्यासाठी पोलिसी बळाचा वापर, सार्वजनिक वाहतुकीवरील निर्बंध आणि मतदारयाद्यांतील वाद हे नेमके कशाचे लक्षण आहे ? सत्ताधार्यांनी लोकशाहीचा कारभार करायचा की दडपशाहीचा ? असा प्रश्न निर्माण झाला आहे. लोकशाहीच्या नावाने राज्य करणाऱ्यांनीच लोकांच्या आवाजाला घाबरायचे का ? असाही प्रश्न सीजेपीच्या आंदोलनाने सत्ताधार्यांबद्दल निर्माण होत आहे. एकूणच ही सत्तेची दडपशाही किती काळ सुरु रहाणार ? लोकशाही म्हणजे केवळ निवडणुका घेणे, बहुमत मिळवणे आणि सत्तेच्या खुर्चीवर बसणे नव्हे. लोकशाही म्हणजे नागरिकांना प्रश्न विचारण्याचा अधिकार, सरकारच्या निर्णयांवर टीका करण्याचे स्वातंत्र्य, शांततेत आंदोलन करण्याची मुभा आणि सत्ताधाऱ्यांना जाब विचारण्याची घटनात्मक ताकद! या मूलभूत मूल्यांची कसोटी लागते ती सत्ताधाऱ्यांच्या विरोधात आवाज उठतो तेव्हा. विरोधकांच्या घोषणांनी सरकार अस्वस्थ झाले, तरुणांच्या प्रश्नांनी सत्तेच्या भिंती हादरल्या आणि नागरिकांनी उत्तरदायित्वाची मागणी केली, म्हणून त्यांच्यावर पोलिसी बळाचा वापर होत असेल, तर लोकशाहीच्या प्रकृतीविषयी गंभीर प्रश्न निर्माण होतात. १० ऑक्टोबर रोजी दिल्लीतील जंतरमंतर येथे कॉक्रोच जनता पार्टीच्या वतीने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन पुकारण्यात आले. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राजधानीतील सुरक्षा व्यवस्था, आंदोलकांना ताब्यात घेण्याच्या घटना, वाहतुकीवरील निर्बंध आणि राजकीय आरोप-प्रत्यारोप यांनी देशाचे लक्ष वेधून घेतले. आंदोलनाला परवानगी नाकारण्यामागे नियमभंग, उशिरा अर्ज आणि कायदा-सुव्यवस्थेची चिंता असल्याची कारणे पोलिसांनी दिली. परंतु, लोकशाहीत आंदोलन नियंत्रित करायचे की आंदोलनाचा आवाजच दाबायचा ? दिल्ली पोलिसांनी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मोठा बंदोबस्त तैनात केला. केंद्रीय सशस्त्र दलाचे सुमारे २३ हजार जवान आणि दिल्ली पोलिसांचे पाच हजार कर्मचारी तैनात असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले. मध्य दिल्लीकडे जाणाऱ्या मार्गांवर तपासणी, काही भागांतील वाहतूक निर्बंध आणि सार्वजनिक हालचालींवरील नियंत्रण यांमुळे राजधानीतील वातावरण तणावपूर्ण झाल्याचे चित्र समोर आले. आंदोलनाशी संबंधित कार्यकर्त्यांना ताब्यात घेण्यात आल्याचेही वृत्त आहे. कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी मुंबईहून दिल्लीला जाताना विमानातच पोलिसांनी ताब्यात घेण्याचा प्रयत्न केल्याचा दावा केला. या दाव्यांची आणि कारवाईच्या सर्व तपशिलांची स्वतंत्र पडताळणी आवश्यक असली, तरी या घटनांनी अभिव्यक्तिस्वातंत्र्य आणि शांततापूर्ण आंदोलनाच्या अधिकारावर चर्चा सुरू केली आहे. सरकारला आंदोलनामुळे वाहतुकीचा प्रश्न निर्माण होईल, सार्वजनिक व्यवस्था विस्कळीत होईल किंवा कायदा-सुव्यवस्थेला धोका निर्माण होईल, अशी चिंता असेल तर ती पूर्णपणे दुर्लक्षित करता येणार नाही. पोलिसांचे कर्तव्य नागरिकांची सुरक्षा राखणे आहे. मात्र, सुरक्षेच्या नावाखाली आंदोलने दडपल्यामुळे सुरक्षा आणि स्वातंत्र्य यांच्यातील समतोल ढासळतो. लोकशाहीत पोलिसांची भूमिका नागरिकांच्या अधिकारांचे रक्षण करणे ही आहे, नागरिकांना गप्प करण्यासाठी नव्हे. सरकारला तरुणांच्या मागण्या चुकीच्या वाटत असतील, तर त्यांचे खंडन करण्यासाठी तथ्ये मांडावीत. प्रश्न विचारणाऱ्याला रोखणे म्हणजे दडपशाही करणे असा अर्थ होतो. लोकशाहीची ताकद विरोधकांना अटकाव करण्यात नाही ; विरोधकांना आपले म्हणणे मांडण्याची किती मोकळीक दिली जाते, यात असते. तरुणाईला देशाची शक्ती आहे, असे म्हणायचे आणि दुसरीकडे प्रश्न विचारणार्या तरुणांना देशद्रोही संबोधायचे, त्यांना अटकाव करायचा, ही लोकशाहीची संकल्पना होऊ शकत नाही. देशातील सामान्य नागरिकांसमोर आज रोजगार, महागाई, शिक्षणाचा खर्च, इंधनाचे दर आणि आर्थिक सुरक्षितता असे अनेक प्रश्न आहेत. नोकरीच्या शोधात असलेला तरुण, कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला शेतकरी, वाढत्या खर्चामुळे बचत गमावणारे मध्यमवर्गीय लोकांच्या अडचणींना उत्तर देण्याऐवजी आंदोलनकर्त्यांची धरपकड हा प्रमुख उद्योग बनला, तर जनतेत सरकारविरोधात असंतोष निर्माण होऊ शकतो. सत्ताधाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की, तरुणाई ही कोणत्याही एका पक्षाची मालमत्ता नाही. ती प्रश्न विचारेल, चुकांवर बोट ठेवेल आणि गरज पडल्यास रस्त्यावरही उतरेल. या कृतीला देशविरोधी ठरवण्यापूर्वी तिच्या मागण्यांमधील तथ्य तपासले पाहिजे. या संपूर्ण वादातील सर्वांत गंभीर मुद्दा म्हणजे मतदारयाद्यांच्या पुनरीक्षणाचा. उपलब्ध वृत्तांमध्ये सुमारे १३ कोटी मतदारांची नावे वगळल्याचा दावा चर्चेत आला आहे.

# मी अंतरवाली गाव दत्तक घेतलंय, बीडमधील गावांएवढचं प्रेम तिथं करणार

पंकजा मुंडेंची भगवानगडावरुन साद




बीड : जय भगवान, छत्रपती शिवाजी महाराज की जय असे म्हणत मंत्री पंकजा मुंडे यांनी भगवानगडावरुन आपल्या भाषणाला सुरुवात केली. भगवानगडावर पंकजा मुंडेंच्या नेतृत्वात दसरा मेळाव्याचं दरवर्षी आयोजन करण्यात येतं. यंदाही मोठ्या संख्येनं या मेळाव्याला मुंडे समर्थकांची गर्दी पाहायला मिळाली. हे सीमोल्लंघनाच दशक आहे, हे वेगळं दशक आहे. या मेळाव्यासाठी सगळीकडून लोक आहेत. पाण्यावर बसून ज्यांनी ज्ञानेश्वरी वाचली ते भगवान बाबा भगवंताचा अवतार आहेत. आपल्याल जातीपातीच्या भिंती मोडून काढायच्या आहेत. जातीपातीच्या जीवावर मोठा होऊ इच्छितो, जो नेता राजकारण करतो, त्याला भविष्य नाही, असेही पंकजा यांनी येथून म्हटले.

वातंत्र्याचा अमृत महोत्सव
स्वच्छ भारत — एक कदम स्वच्छता की ओर

## कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नवीन प्रशासकीय ईमारत, मा. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पुर्व),कुळगाव, पिन – ४२१५०३, ता. अंबरनाथ जि. ठाणे
ई–मेल : coud.kulgaonbadlapur@maharashtra.gov.in वेबसाईट :- kbmc.gov.in

जा. क्र.: कुबनप/नगरोत्थान/साबां/१०५३/२०२६–२७ दिनांक : १९/१०/२०२६

**जाहिर ई– निविदा सुचना क्र. ५२ / २०२६ – २७**

कुळगांव–बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत सन २०२६ – २७ करिता प्रशासकीय मंजूर प्राप्त झालेल्या ०४ विकास कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या ई– निविदा मागविण्यात येत आहेत. सदर ई–निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि. २१/१०/२०२६ ते दि.२८/१०/२०२६ रोजी दुपारी.१२.०० वाजेपर्यंत असून दि. २३/१०/२०२६ रोजी दुपारी १२.०० वा निविदा पुर्व बैठक नगरपरिषद कार्यालयात आयोजित केलेली आहे. तसेच सदरची ई– निविदा दि. २९/१०/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजल्यानंतर उघडण्यात येतील.
निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर व नगरपरिषदेच्या सुचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

शिक्का

सही/–
(मारुती गायकवाड)
मुख्याधिकारी
कुळगांव बदलापूर नगरपरिषद

## नवी मुंबई महानगरपालिका

शहर अभियंता (विदयुत विभाग)
निविदा सुचनाक्र. कार्यकारी अभियंता, (विदयुत-1)/ 28 / 2026-27

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम (रू.) |
|---|---|---|
| 1 | बेलापुर विभागातील सेक्टर 1A फायर स्टेशन येथे मराठी नाम फलक (LED Signage Board) लावणे. | 20,62,535/- |
| 2 | नेरूळ विभागातील प्रभाग क्रं.23, सेक्टर १० येथे नवीन दिवाबत्तीची सोय करणे. | 20,31,762/- |
| 3 | नेरूळ विभागातील सेक्टर ८ एल मार्केट येथे नवीन Mini Highmast खांब व फिटिंग लावणेबाबत | 4,20,428/- |
| 4 | वाशी गाव भुयारी मार्ग येथे नविन ट्रफिक सिग्नल बसविणे. | 8,55,154/- |
| 5 | वाशी विभागात शहरी आरोग्य अभियान 15 वित्तीय आयोग अंतर्गत Pre Fabricated Porta Cabin यांना विद्युत जोडणी व अनुषंगीक काम करणे. | 4,13,299/- |
| 6 | तुर्भे सेक्टर २० येथील तुर्भे स्टेशन जवळ नमुंमपा मार्फत देण्यात आलेल्या दिव्यांग स्टॉल करीता नवीन वीज पुरवता घेणे व इतर विद्युत विषयक काम करणे. | 5,17,635/- |
| 7 | नेरूळ विभागातील प्रभाग क्रं. 21, शिरवणे गाव गणेशवाडी येथे नवीन दिवाबत्ती लावणे. | 4,22,107/- |

निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.21/10/2026 रोजी प्राप्त होतील.निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online करण्याचे आहे. ई-निविदा ई-टेंडरिंग (E-Tendering) प्रकियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणीसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबरवर संपर्क करावे.

कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.

सही/-
तानाजी शिंदे
कार्यकारी अभियंता (विदयुत विभाग)
जा.क्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/904/2026 नवी मुंबई महानगरपालिका




## राष्ट्रीय पात्रता चाचणी (नेट) परीक्षा-डिसेंबर 2026

■ परीक्षेचे नाव: UGC NET डिसेंबर 2026
■ पदाचे नाव & तपशील:
1 JRF & सहायक प्राध्यापक —
■ शैक्षणिक पात्रता: 55% गुणांसह मास्टर पदवी /पदव्युत्तर पदवी किंवा समतुल्य [SC/ST/OBC/PWD/Transgender: 50% गुण]
■ वयाची अट: 01 डिसेंबर 2026 रोजी, [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
JRF: 30 वर्षांपर्यंत.
सहायक प्राध्यापक: वयाची अट नाही.
■ Fee: GEN: ₹1150/-, [OBC/EWS: ₹600/-, SC/ST/PWD: ₹325/-]
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
महत्त्वाच्या तारखा:
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 28 ऑक्टोबर 2026 (11:50 PM)
500/- रुपये विलंब शुल्कासह अर्ज करण्याची तारीख: 29 ते 31 ऑक्टोबर 2026 (11:50 PM)
■ अर्ज दुरुस्ती: 02 ते 04 नोव्हेंबर 2026
■ परीक्षा: 14 ते 19 डिसेंबर 2026
Zअधिकृत वेबसाइट
https://ugcnet.nta.ac.in/

## नॅशनल इन्शुरन्स कंपनी लि.

■ पदाचे नाव & तपशील:
1 एडमिनिस्ट्रेटिव ऑफिसर फायनान्स (CA & CMA) 20
2 लीगल 20
3 IT 11
4 ऑटोमोबाइल इंजिनिअर्स 20
5 रिस्क इंजिनिअर्स 28
6 कंपनी सेक्रेटरीज 02
7 अॅग्रीकल्चर 20
8 जनरलिस्ट 200
■ शैक्षणिक पात्रता:
फायनान्स (CA & CMA): (i) CA/ ICWA (ii) 60% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी/पदव्युत्तर पदवी [SC/ST: 55% गुण]
लीगल: 60% गुणांसह विधी पदवी/पदव्युत्तर पदवी [SC/ST: 55% गुण]
IT: 60% गुणांसह B.E/B. Tech/M.E./M.Tech (कॉम्प्युटर सायन्स / IT) किंवा MCA [SC/ST: 55% गुण]
ऑटोमोबाइल: 60% गुणांसह B.E./B. Tech./M.E./M.Tech.(ऑटोमोबाइल) किंवा B.E./B.Tech./M.E./M.Tech + ऑटोमोबाइल इंजिनिअरिंग डिप्लोमा [SC/ST: 55% गुण]
रिस्क इंजिनिअर्स: 60% गुणांसह कोणत्याही शाखेतील इंजिनिअरिंग पदवी/पदव्युत्तर पदवी (कॉम्प्युटर सायन्स / IT/ऑटोमोबाइल वगळून) [SC/ST: 55% गुण]
कंपनी सेक्रेटरीज: (i) ACS/FCS (ii) 60% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी/पदव्युत्तर पदवी [SC/ST: 55% गुण]
अॅग्रीकल्चर: 60% गुणांसह कृषी, कृषी जैवतंत्रज्ञान किंवा कृषी अभियांत्रिकीमधील पदवीधर / पदव्युत्तर पदवीधर [SC/ST: 55% गुण]
जनरलिस्ट: 60% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी/पदव्युत्तर पदवी [SC/ST: 55% गुण]
■ वयाची अट: 01 ऑक्टोबर 2026 रोजी 21 ते 30 वर्षे [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: GEN/OBC/EWS: ₹1000/- [SC/ST/PWD: ₹250/-]
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
महत्त्वाच्या तारखा:
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 28 ऑक्टोबर 2026
परीक्षा (Phase I): 17 नोव्हेंबर 2026
परीक्षा (Phase II): 22 डिसेंबर 2026
■ अधिकृत वेबसाइट
https://nationalinsurance.nic.co.in/

## ठाणे कोतवाल भरती 2026

■ पदाचे नाव & तपशील:
1 महसूल सेवक (कोतवाल)
ठाणे 24
भिवंडी (नॉन पेसा) 11
भिवंडी (पेसा) 03
कल्याण 14
अंबरनाथ 21
मुरबाड (पेसा 25 ते 50% व 50% जास्त) 04
मुरबाड (पेसा 0 ते 25%) 04
मुरबाड (नॉन पेसा) 11
शहापूर (पेसा 25 ते 50% व 50% जास्त) 11
शहापूर (नॉन पेसा) 08
Total 111
■ शैक्षणिक पात्रता: (i) 04थी उत्तीर्ण (ii) स्थानिक रहिवासी
■ वयाची अट: 01 ऑक्टोबर 2026 रोजी 18 ते 40 वर्षे.
Zनोकरी ठिकाण: ठाणे
■ Fee: खुला प्रवर्ग:₹600/- [मागासवर्गीय: ₹500/-]
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
महत्त्वाच्या तारखा:
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 21 ऑक्टोबर 2026 (05:00 PM)
परीक्षा: 15 नोव्हेंबर 2026
■ अधिकृत वेबसाइट
https://thane.nic.in/en/

## भारतीय तटरक्षक दल भरती 2026

■ परीक्षेचे नाव: कोस्ट गार्ड एनरोल्ड पर्सोनल




टेस्ट (CGEPT) – 01/2027 & 02/2027 बॅच
■ पदाचे नाव & तपशील:
CGEPT-01/27 बॅच
1 नाविक (GD) 130
2 यांत्रिक (मेकॅनिकल) 28
3 यांत्रिक (इलेक्ट्रिकल) 23
4 यांत्रिक (इलेक्ट्रॉनिक्स) 09
CGEPT-02/27 बॅच
5 नाविक (GD) 130
6 नाविक (DB) 25
7 हायजिनिस्ट-I 20
■ शैक्षणिक पात्रता:
नाविक (GD): 12वी उत्तीर्ण (Maths & Physics)
नाविक (DB): 10वी उत्तीर्ण
यांत्रिक: 10वी उत्तीर्ण + 03-04 वर्षीय इंजिनिअरिंग डिप्लोमा (इलेक्ट्रिकल / मेकॅनिकल / इलेक्ट्रॉनिक्स / टेलिकम्युनिकेशन (रेडिओ / पॉवर) इंजिनिअरिंग) किंवा 10वी & 12वी उत्तीर्ण + 02-03 वर्षीय इंजिनिअरिंग डिप्लोमा (इलेक्ट्रिकल / मेकॅनिकल / इलेक्ट्रॉनिक्स / टेलिकम्युनिकेशन (रेडिओ / पॉवर) इंजिनिअरिंग)
हायजिनिस्ट-I: 10वी उत्तीर्ण किंवा ITI
वयाची अट: [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
नाविक (GD): 01 नोव्हेंबर 2005 ते 01 मे 2009
नाविक (DB): 01 नोव्हेंबर 2005 ते 01 ऑक्टोबर 2009
यांत्रिक: 01 मे 2005 ते 01 मे 2009
हायजिनिस्ट-I: 01 नोव्हेंबर 2002 ते 01 ऑक्टोबर 2009
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: GEN/OBC/EWS: ₹550/- [SC/ST: फी नाही]
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
महत्त्वाच्या तारखा:
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 27 ऑक्टोबर 2026 (11:30 PM)
परीक्षा (Stage-I): नोव्हेंबर 2026
परीक्षा (Stage-II): फेब्रुवारी 2027
परीक्षा (Stage-III): मे/ऑक्टोबर 2027
■ अधिकृत वेबसाइट
https://indiancoastguard.gov.in/

# एल निनोचे सावट, थेंब थेंब जपतेय ठाणे !

*** पाणीगळती रोखण्यासाठी महापालिकेचा आधुनिक तंत्रज्ञानाचा आधार; दीड वर्षात पावणेपाच हजार ठिकाणची गळती रोखली!**

ठाणे : पाण्याचा प्रत्येक थेंब अनमोल, त्याची बचत म्हणजे भविष्याची शाश्वती... एल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे पाणीटंचाईचे सावट गडद होण्याची शक्यता असताना ठाणे महापालिकेने जलसंवर्धनासाठी कंबर कसली आहे. गेल्या दीड वर्षात पावणेपाच हजार ठिकाणची पाणीगळती रोखल्यानंतर आता आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने गळती शोधून पाण्याची नासाडी थांबवण्यावर भर दिला जाणार आहे.

ठाणे शहराला दररोज सुमारे ५९० दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणीपुरवठा केला जातो. वाढती लोकसंख्या आणि पाण्याची वाढती मागणी लक्षात घेता उपलब्ध पाण्याचे योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. यासाठी महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून नागरिकांच्या तक्रारी तसेच प्रत्यक्ष पाहणीदरम्यान निदर्शनास आलेल्या गळतीच्या ठिकाणी दुरुस्ती केली जात आहे. यामध्ये १५ मिलिमीटरपासून ते १५०० मिलिमीटर व्यासाच्या जलवाहिन्यांचा समावेश आहे.

यंदा पावसाचे कमी प्रमाण आणि एल निनोच्या



संभाव्य प्रभावाच्या पार्श्वभूमीवर पाण्याच्या उपलब्धतेबाबत अधिक दक्ष राहण्याची गरज आहे. त्यामुळे शहरातील जलवाहिन्यांची स्थिती तपासण्यासाठी महापालिका आधुनिक तंत्रज्ञानाचा आधार घेणार आहे. प्रेशर मॉनिटरिंग, रडार तंत्रज्ञान आणि सीसीटीव्ही रोबोटच्या माध्यमातून जलवाहिन्यांमधील गळती शोधण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या तंत्रज्ञानामुळे गळतीची ठिकाणे शोधून आवश्यक दुरुस्ती करण्यास आणि पाण्याची नासाडी कमी करण्यास मदत होणार आहे. याबाबतची माहिती महापालिका उपनगर अभियंता विनोद पवार यांनी दिली.

महापालिकेच्या या प्रयत्नांना नागरिकांच्या सहकार्याची जोड मिळाल्यास पाणीबचतीची मोहीम अधिक प्रभावी होऊ शकते. घरातील नळ, पाण्याच्या टाक्या आणि पाण्याच्या जोडण्यांमधील गळती तातडीने दुरुस्त करणे, गरजेपुरतेच पाणी वापरणे आणि पाण्याचा अनावश्यक वापर टाळणे, अशा छोट्या कृतींतूनही मोठ्या प्रमाणात बचत साधता येऊ शकते.

> “ शहरातील पाणीगळती रोखून पाण्याची बचत करण्याला प्राधान्य असून, गळती शोधण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. नागरिकांनीही पाण्याचा जपून वापर करावा आणि सार्वजनिक ठिकाणी जलवाहिन्यांमधून पाणी वाहताना दिसल्यास महापालिकेला कळवावे.
> - विनोद पवार (उपनगर अभियंता, ठाणे महानगर पालिका)

# कल्याण पूर्वेत ज्ञानेश्वर माऊली ग्रंथालयात वाचन प्रेरणा दिन साजरा

**डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन**





कल्याण (दिवाकर गोळपकर) : कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी येथील ज्ञानेश्वर माऊली ग्रंथालयाच्या वतीने भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ कवयित्री सुरेखा गावंडे यांनी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेला अभिवादन करून त्यांच्या वाचनप्रेमाविषयी आणि विचारांविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

डॉ. कलाम हे कुराण आणि भगवद्गीता या दोन्ही धर्मग्रंथांचे उत्तम वाचक होते. वाचनातून मिळणारे ज्ञान माणसाला समृद्ध करते आणि त्याच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देते, असे त्यांनी सांगितले. डॉ. कलाम यांच्या विचारांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून विद्यार्थ्यांनी नियमित वाचनाची सवय लावून घ्यावी, असे आवाहनही गावंडे यांनी केले.

डॉ. कलाम यांच्या प्रेरणेने त्यांच्या कन्या संजना यांनी अमेरिकेत अंतराळयान निर्मितीच्या क्षेत्रात यश मिळवल्याचा उल्लेख करताना, स्वतःच्या विमानातून आईला अवकाशभ्रमण घडवून आणल्याचा अभिमान असल्याचेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला सार्वजनिक वाचनालय (प.)चे संचालक अरविंद शिंपी, स्त्री मुक्ती समाज संघटनेच्या वर्षा कळके आणि विशेष अतिथी डॉ. ऐश्वर्या तांबोळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन ग्रंथालयाचे अध्यक्ष तानाजी सहाणे यांनी केले.

दरम्यान, नेतीवली येथील पार्वतीबाई सहाणे सार्वजनिक वाचनालयाच्या वतीनेही डॉ. कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त चित्रकला आणि समूह वाचन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांना विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे संयोजन व संचालन ग्रंथपाल ज्योती सहाणे, यश सावंत आणि दिव्या सहाणे यांनी केले. ज्येष्ठ नागरिक संघाचे सचिव डी. आर. उंबरकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# पालघर एसटी बस प्रवासातील एनसीएमसी कार्ड धारकांपुढे तांत्रिक अडचणी

पालघर : पालघर जिल्ह्यात एसटी बसने प्रवास करणाऱ्या महिला, ज्येष्ठ नागरिक आणि आदिवासी प्रवाशांना स्मार्ट कार्ड प्रणालीतील (एमसीएमसी कार्ड) तांत्रिक अडचणींमुळे त्रास सहन करावा लागत असल्याचा मुद्दा समोर आला आहे. कार्डमध्ये शिल्लक रक्कम असतानाही तिकीट मशीनमधील बिघाडामुळे काही प्रवाशांना पूर्ण तिकीट काढावे लागत असल्याचा आरोप स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून केला जात आहे.

महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी शासनाकडून लागू करण्यात आलेल्या सवलतींचा लाभ घेण्यासाठी एसटी प्रशासनाकडून स्मार्ट कार्ड 1 ऑक्टोबर पासून अनिवार्य करण्यात आले आहे. ग्रामीण भागात एनसीएमसी कार्ड वापरताना एसटीच्या तिकीट मशीनमध्ये बिघाड होणे, सर्व्हर डाऊन असणे आणि कार्ड सिंक न होणे अशा समस्या निर्माण होत आहेत. याचा सर्वाधिक फटका पालघर जिल्ह्यातील ग्रामीण व आदिवासी भागातील प्रवाशांना बसत असून, त्यांना आर्थिक भुर्दंडासोबतच मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. तसेच वाहकांना या नवीन प्रणालीचे योग्य व स्पष्ट प्रशिक्षण दिले आहे का, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.

प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी तिकीट मशीन आणि सर्व्हरमधील तांत्रिक बिघाड तातडीने दुरुस्त करावा, वाहकांना योग्य प्रशिक्षण द्यावे आणि तांत्रिक समस्या पूर्णपणे सुटेपर्यंत जुने ओळखपत्र किंवा आधार कार्ड सवलतीसाठी ग्राह्य धरावे, अशी प्रमुख मागणी प्रशासनाकडे करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकरणाबाबत पालघर एसटी विभाग नियंत्रक कल्याणी ढगे यांच्याशी संपर्क साधला असता, या समस्येबाबत अद्याप कोणतीही अधिकृत किंवा लिखित तक्रार एसटी प्रशासनाकडे दाखल झालेली नाही. ज्या प्रवाशांकडे अद्याप स्मार्ट कार्ड नाही, त्यांनी नजीकच्या एसटी आगारात जाऊन आपले एनसीएमसी स्मार्ट कार्ड लवकरात लवकर काढून घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले आहे. तसेच, नियमानुसार सवलतीचे वैध स्मार्ट कार्ड उपलब्ध नसल्यास प्रवाशांकडून पूर्ण तिकीट आकारले जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.एकीकडे तांत्रिक अडचणींमुळे प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे, तर दुसरीकडे प्रशासनाने अधिकृत तक्रार नसून नागरिकांनी कार्ड काढून घ्यावे असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे या समस्येवर तोडगा काढण्यासाठी एसटी महामंडळ व संबंधित प्रशासन आगामी काळात नेमकी काय पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> “ पालघर जिल्ह्यातील अनेक नागरिक दैनंदिन प्रवासासाठी एसटीवर अवलंबून आहेत. अशा परिस्थितीत सवलतींचा लाभ मिळवताना तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत असेल, तर या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे. शासनाच्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी तंत्रज्ञानाबरोबरच योग्य प्रशिक्षण आणि प्रभावी अंमलबजावणीही महत्त्वाची आहे.
> - गीता संखे, महिला उपजिल्हाप्रमुख, पालघर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)

# नवी मुंबईतील हवा प्रदूषणात वाढ

नवी मुंबई : गेल्या काही दिवसांपासून नवी मुंबईतील हवेच्या गुणवत्तेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. शहरातील हवा गुणवत्ता निर्देशांकात सलग तीन दिवस वाढ झाल्याने प्रदूषणाची चिंता वाढली आहे. रविवारी (१८ ऑक्टोबर) हा निर्देशांक १४७ वर पोहोचला. सोमवारी (१९ ऑक्टोबर) शहराचा एकत्रित निर्देशांक काहीसा कमी होऊन १२३ झाला असला, तरी महापे आणि वाशीतील कोपरीगाव परिसरातील नोंदी तुलनेने अधिक नोंदविल्या गेल्या. वाढती वाहनसंख्या, बांधकामांमधून उडणारी धूळ आणि औद्योगिक क्षेत्रातील संभाव्य उत्सर्जनाच्या पार्श्वभूमीवर शहरातील हवेच्या गुणवत्तेकडे गांभीर्यपूर्वक लक्ष देऊन ठोस उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

पावसाळ्यात रस्त्यांवरील धूलिकण खाली बसतात. पाऊस ओसरल्यानंतर रस्ते कोरडे होऊ लागल्याने वाहनांच्या वर्दळीमुळे धूळ पुन्हा हवेत मिसळते. नवी मुंबईतील विविध भागांत सुरू असलेली बांधकामे, बांधकाम साहित्याची वाहतूक आणि वाहनांच्या धुरातून बाहेर पडणारी प्रदूषके यांचाही हवेच्या गुणवत्तेवर परिणाम होत आहे. सप्टेंबर महिन्यानंतर वातावरणात होणारे बदल आणि वाऱ्याचा कमी झालेला वेग यांमुळेही अनेक भागात ही प्रदूषके स्थिरावत असल्याने सकाळी आणि रात्री धुरकट वातावरण जाणवत असल्याचे सांगितले जात आहे.

शहराच्या एकत्रित निर्देशांकात सोमवारी घट झाली असली, तरी स्थानिक पातळीवरील नोंदींमध्ये फरक दिसतो. शुक्रवारी (१६ ऑक्टोबर) शहराचा निर्देशांक ११७, शनिवारी (१७ ऑक्टोबर) १३४ आणि रविवारी १४७ होता. तीन दिवसांत निर्देशांकात ३० अंकांची वाढ पहायला मिळाली.

# विविध कार्यक्रमांसाठी उपयोगी अत्याधुनिक सभागृहाचे आणि 59 नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रांचे लोकार्पण संपन्न

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळांचा गुणात्मक दर्जा उंचावत असून सेक्टर 11 कोपरखैरणेतील अत्यंत आकर्षक अशा महापालिका शाळेमध्ये अत्याधुनिक सुविधांनी परिपूर्ण असे सभागृह शालेय कार्यक्रमांप्रमाणेच इतरही सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी अत्यंत उपयोगी ठरणार असल्याचे सांगत महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री ना. गणेश नाईक यांनी नागरिकांसाठी अतिशय उपयुक्त अशी सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल अभिनंदन केले. त्याचप्रमाणे नागरिकांच्या छोट्या छोट्या आजारांसाठी त्यांच्या घराजवळच 59 नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रे ही केंद्र सरकारच्या योजनेतून उपलब्ध होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला. ही केंद्रे उत्तम रितीने चालतील व नागरिकांना दिलासाजनक सेवा देतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर कोपरखैरणे सेक्टर 11 येथील नमुंमपा सीबीएसई शाळा क्र. 94 मधील अत्याधुनिक सभागृहाचे लोकार्पण तसेच नमुंमपा क्षेत्रातील 59 नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रांचे दूरदृश्य प्रणालीव्दारे लोकार्पण महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री ना. गणेश नाईक यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी महापौर श्रीम.सुजाता पाटील, माजी खासदार संजीव नाईक, सभागृह नेते सागर नाईक, आरोग्य समिती सभापती डॉ.जयाजी नाथ, प्रभाग समिती अध्यक्ष प्रकाश मोरे व भरत भोईर, नगरसेवक मुनावर पटेल, श्रीम. वैष्णवी नाईक, श्रीम.अदिती नाईक, राजू मढवी, माजी नगरसेवक लिलाधर नाईक, परिवहन सदस्य विनोद म्हात्रे तसेच शिक्षण विभाग उपआयुक्त श्रीम.संघरत्ना खिल्लारे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.राजेश म्हात्रे, घनकचरा व्यवस्थापन विभाग उपआयुक्त डॉ.अजय गडदे, कार्यकारी अभियंता अजय संख्ये, श्रीम. बागेश्री कोलते, विभाग अधिकारी भरत धांडे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना महापौर श्रीम. सुजाता पाटील यांनी महानगरपालिका गुणवत्तापूर्ण शिक्षणावर विशेष लक्ष देत असल्याचे सांगत तशा प्रकारच्या सुविधा शाळांमध्ये उपलब्ध करून देऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास केला जात आहे. अद्ययावत तंत्रप्रणालीने सुसज्ज हे सभागृह हा त्याच वाटचालीचा एक भाग असल्याचे त्यांनी सांगितले. गोरगरीबांच्या मुलांना सुरूवातीपासूनच इंग्रजी शिक्षण मिळावे यासाठी नर्सरीपासून इंग्रजी शिक्षण सुरू केले असून त्याबद्दल नागरिकांकडून अत्यंत समाधानकारक



अभिप्राय प्राप्त होत आहेत. तशाच प्रकारे विविध 59 ठिकाणी सुरू होणारी आरोग्यवर्धिनी केंद्रेही नागरिकांना प्राथमिक स्तरावर चांगली आरोग्य सुविधा पुरवतील असा विश्वास व्यक्त करीत महानगरपालिका सर्वच क्षेत्रात उत्तम सुविधा पुरविण्यासाठी कटिबध्द असल्याचे त्यांनी सांगितले.

माजी खासदार संजीव नाईक यांनी नागरिकांच्या विविध कार्यक्रमांसाठी विष्णुदास भावे नाट्यगृहाला हा एक चांगला पर्याय उपलब्ध असल्याचे मत व्यक्त करीत याची देखभाल - दुरूस्ती व्यवस्थितरित्या करावी अशी सूचना केली. नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र ही देखील चांगली सुविधा असून त्याठिकाणी टेलिकन्सल्टेशन सुविधा उपलब्ध करून द्यावी असे त्यांनी सूचित केले.

सभागृहनेते सागर नाईक यांनी प्रास्ताविकपर मनोगतात खाजगी शाळांसारखा दर्जा असणा-या कोपरखैरणेच्या महानगरपालिका शाळेत लोकार्पण होत असलेले 650 आसन क्षमतेचे सभागृह अत्यंत अत्याधुनिक अशी ध्वनी व प्रकाश योजना असणारे असून ही नवी मुंबईकर नागरिकांना दसऱ्याची भेट असल्याचे सांगितले. यापुढील काळात हाती घेतलेल्या शिक्षण धोरणाच्या अनुषंगाने अधिक उत्तम काम केले जाईल अशी खात्री त्यांनी दिली. आरोग्य व्यवस्थेला सक्षम करणा-या नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रांचाही चांगला उपयोग करून घ्यावा असे आवाहन करतानाच एकात्मिक आरोग्य धोरणाव्दारे अधिक गुणवत्तापूर्ण आरोग्य व्यवस्थेकडे वाटचाल सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

आरोग्य समितीचे सभापती डॉ. जयाजी नाथ यांनी आभार प्रदर्शन केलेल्या या लोकार्पण समारंभाप्रसंगी दसऱ्याचा सणाचा दिवस असूनही नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कोपरखैरणे सेक्टर 11 येथील नमुंमपा सीबीएसई शाळा क्र. 94 मध्ये चौथ्या मजल्यावर 650 आसन क्षमतेचे हे अत्याधुनिक साधनसामुग्रीने सुसज्ज असे वातानुकूलित सभागृह निर्माण करण्यात आले आहे. याठिकाणी 650 चौ.फूटाचा प्रशस्त रंगमंच असून आधुनिक प्रकारची ध्वनी व प्रकाशयोजना आहे. उत्कृष्ट ध्वनीप्रतिसादाच्या दृष्टीने याठिकाणी विशेष ध्वनिकी रचना करण्यात आलेली आहे. विशेष म्हणजे येथे रंगमंचीय सादरीकरणाप्रमाणेच पडद्यावर ध्वनीचित्रफित प्रदर्शित करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

अशाचप्रकारे राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान आणि 15 व्या वित्त आयोगाच्या अंतर्गत शहरी भागातील नागरिकांना प्राथमिक आरोग्य सेवा पुरविण्यासाठी 59 नागरी आरोग्यवर्धिनी केंद्रे नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात ठिकठिकाणी सुरू करण्यात आलेली आहेत. याव्दारे नागरिकांना त्यांच्या घराजवळच दर्जेदार व मोफत प्राथमिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून याठिकाणी ताप, सर्दी, खोकला व इतर किरकोळ आजारांवर मोफत उपचार होणार आहेत तसेच माता व बाल आरोग्य, गरोदर महिलांची तपासणी, लसीकरण, रक्त तपासणी व इतर मूलभूत चाचण्या तसेच मधुमेह, उच्च रक्तदाब यांचे स्क्रिनींग आणि समुपदेशन अशा सुविधा उपलब्ध असणार आहेत.

नागरिकांसाठी दर्जेदार सेवासुविधा उपलब्ध करून देण्याची कटिबध्दता जपत या दोन्ही सुविधांचा लाभ नागरिकांनी घ्यावा असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले.

# दुष्काळात सरकार आणि शिवसेना दोन्ही मैदानात

■ दिवाळीचा शिधा घेऊन ठाण्यातून ट्रक थेट दुष्काळग्रस्त भागाकडे रवाना ■ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मदत साहित्याला दाखवला भगवा झेंडा






ठाणे (गणेश भोईटे) : महाराष्ट्रावर दुष्काळाचे सावट असताना शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार आणि शिवसेना अशा दोन्ही पातळ्यांवर मदतीचा हात पुढे करण्यात आला आहे. सरकारची मदत खात्यात आणि शिवसेनेचा दिवाळीचा शिधा थेट शेतकऱ्यांच्या घरात, असा दुहेरी मदतीचा उपक्रम राबविण्यात येत आहे. ठाण्यातील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निवासस्थान असलेल्या शुभदीप बंगला, येथून दुष्काळग्रस्तांसाठी मदत साहित्याने भरलेले ट्रक रवाना करण्यात आले.

यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार नरेश म्हस्के, आमदार रवींद्र फाटक, महापौर शर्मिला पिंपळोलकर, शिवसेना सचिव राम रेपाळे, सभागृह नेते हनुमंत जगदाळे, गटनेते पवन कदम, शिवसेना राज्य संघटन प्रमुख आनंद परांजपे, प्रवक्ते राहुल लोंढे आणि शिवसेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दसऱ्यानिमित्त नागरिक, पत्रकार बांधव आणि बळीराजाला सुख, समाधान व समृद्धीच्या शुभेच्छा देताना शिंदे म्हणाले, "शेतकऱ्यांची दिवाळी आम्ही काळी होऊ देणार नाही." मुख्यमंत्री, मंत्रिमंडळातील सहकारी, आमदार व खासदारांनी दुष्काळग्रस्त भागात शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. दुष्काळ जाहीर करण्याची मागणी मान्य करून महाराष्ट्रात दुष्काळ जाहीर केला असून, मदत देताना सरकार हात आखडता घेणार नाही.

5 हजारांची मदत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली जात आहे. गेल्या वर्षी अतिवृष्टीने शेतजमीन खरडून गेली, गुरेढोरे आणि उभी पिके वाहून गेली; यंदा दुष्काळाने पिके करपली. मुलांचे शिक्षण, मुलींची लग्ने आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहाच्या अडचणीही सरकार समजून घेत असून पूर्ण मदत केली जाईल. केंद्र सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदीही शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

> " दसरा मेळाव्यातूनही मदत साहित्याचे ट्रक रवाना होणार आहेत. "80 टक्के समाजकारण, 20 टक्के राजकारण" या भूमिकेतून हा उपक्रम सुरू असून, दुष्काळामुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांच्या मुलींच्या लग्नाची जबाबदारीही शिवसेना उचलणार आहे. आमदार, जिल्हाप्रमुख व तालुकाप्रमुखांना अशा कुटुंबांची नोंद घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सरकारची मदत खात्यात आणि शिवसेनेचा शिधा घरात, या माध्यमातून शेतकऱ्यांना संकटात एकटे सोडले जाणार नाही, असा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला.

दरम्यान, शिवसेनेच्या माध्यमातून दिवाळीचा शिधा भरलेले शेकडो ट्रक टप्प्याटप्प्याने दुष्काळग्रस्त भागात पाठविले जाणार आहेत. कार्यकर्ते शेतकऱ्यांच्या बांधावर, घरात आणि दारापर्यंत पोहोचून साहित्य देणार आहेत. "मदतीचे तोरण हे शिवसेनेचे धोरण आहे. संकट तिथे शिवसेना, आपत्ती तिथे शिवसैनिक हे शिवसेनेचे ब्रीद वाक्य असून, शिंदे यांनी बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांच्या विचारांचा वारसा शिवसेना पुढे घेऊन जात असल्याचे स्पष्ट केले.

नवरात्रोत्सवात खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी अत्यंत साधेपणाने उत्सव साजरा करत आपली परंपरा आणि संस्कृती जपण्याचे काम केले. त्याचबरोबर या उत्सवाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना मदत करण्याचे कामही करण्यात आले, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

ठाण्याच्या महापौरांच्या चालकाकडून पत्रकाराला झालेल्या मारहाणीच्या घटनेबाबत बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकाराला मारहाण करणे अत्यंत चुकीचे असल्याचे स्पष्ट केले. पत्रकारांच्या पाठीशी आम्ही सदैव उभे राहिलो आहोत. संबंधित व्यक्तीने काही चूक केली असेल, तर त्याची चौकशी करून नक्कीच कारवाई केली जाईल, असेही शिंदे यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले.

## लावण्या बागलेचा युवा लेखिका म्हणून गौरव!

'The Water Guardian' या पुस्तकाच्या लेखन व प्रकाशनाबद्दल 'The Young Author's Recognition' पुरस्काराने सन्मानित

भिवंडी (सुनील झळके) : सेंट झेवियर्स हायस्कूल, नवी मुंबई (St. Xavier's High School, Navi Mumbai) येथे इयत्ता सातवी, विभाग 'बी'मध्ये शिक्षण घेणाऱ्या कुमारी लावण्या अंजली विजयकुमार बागले हिने लेखन क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. 'The Water Guardian' या पुस्तकाचे लेखन करून ते BriBooks या व्यासपीठावर प्रकाशित केल्याबद्दल तिला *'The Young Author's Recognition'* या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. National Young Authors Fair 2026–27 या उपक्रमांतर्गत मिळालेला हा सन्मान तिच्या सर्जनशीलतेची, कल्पकतेची आणि साहित्यिक प्रतिभेची पोचपावती ठरला आहे.

'The Water Guardian' या पुस्तकाच्या शीर्षकातून पाणीसंवर्धन आणि जलसंपत्तीचे संरक्षण यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांबाबत जागरूकता निर्माण करण्याचा संदेश अधोरेखित होतो. लहान वयातच



पुस्तकलेखन करून ते प्रकाशित करण्याची लावण्याची कामगिरी तिची लेखनाविषयीची आवड, कल्पक विचारशक्ती, जिद्द आणि सर्जनशील अभिव्यक्ती यांचे प्रेरणादायी उदाहरण आहे. तिच्या या यशामुळे बालवयातच वाचन आणि लेखनाची गोडी जोपासणाऱ्या विद्यार्थ्यांना निश्चितच प्रेरणा मिळेल.

लावण्याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल मुंबई शहर शिक्षक विकास मंडळाचे अध्यक्ष-डॉ. विशाल कडणे, दिलीप बागले,नंदा बागले, शशिकला सोनवणे, केशव बागले, डॉ. आरती बागले, विजय बागले, अंजली बागले, प्रशांत बागले, सौ. रसिका बागले, स्वप्निल सोनवणे, कु. पार्थ बागले, कु. नेहल बागले, कु. मृणमय बागले, कु. प्रियांश बागले, तसेच तिचे काका-मावशी, सर्व नातेवाईक, शाळेतील शिक्षकवृंद आणि समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून तिचे अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.

लहान वयातच साहित्यविश्वात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करण्याच्या दिशेने पहिले महत्त्वपूर्ण पाऊल टाकणाऱ्या लावण्याच्या पुढील साहित्यिक वाटचालीसाठी सर्वांनी मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत. तिच्या हातून भविष्यातही दर्जेदार, प्रेरणादायी आणि समाजोपयोगी साहित्यनिर्मिती घडो, अशाही सदिच्छा यावेळी अनेकांनी व्यक्त केल्या.

## पारंपरिक जागरण-गोंधळाने डोंबिवलीतील शारदीय नवरात्रोत्सवाची सांगता

■ खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांची उपस्थिती ■ रात्री २ ते सकाळी ६ वाजेपर्यंत रंगला जागरण-गोंधळाचा भक्तिमय सोहळा ■ संबळाच्या निनादात आणि देवीच्या जयघोषात डोंबिवलीकरांचा उत्स्फूर्त सहभाग

डोंबिवली : सनातन संस्कृतीचा वारसा जपत, पारंपरिक जागरण-गोंधळाच्या भक्तिमय सोहळ्यात डोंबिवलीतील शारदीय नवरात्रोत्सवाची सांगता झाली. खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशन आणि श्री नवदुर्गा युवा मंडळ यांच्या वतीने आयोजित या नवरात्रोत्सवाच्या अखेरच्या रात्री खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी जागरण-गोंधळात सहभागी होत आई तुळजाभवानीचा जागर केला. तर रात्री २ ते सकाळी ६ वाजेपर्यंत रंगलेल्या या पारंपरिक सोहळ्यात डोंबिवलीतील अनेक नागरिक, भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले. संबळाचा निनाद, पारंपरिक नृत्य, दिवट्यांचा प्रकाश आणि आई तुळजाभवानीच्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला.



महाराष्ट्राच्या समृद्ध लोकसंस्कृतीचा अविभाज्य भाग असलेला जागरण-गोंधळ हा नवरात्रोत्सवातील महत्त्वाचा धार्मिक आणि सांस्कृतिक विधी मानला जातो. देवीची आराधना, पारंपरिक लोककला आणि सामूहिक श्रद्धा यांचा सुंदर संगम असलेली ही परंपरा आजही जपली जात आहे. याच सांस्कृतिक वारशाचे जतन करण्याच्या उद्देशाने नवरात्रोत्सवाच्या सांगतेनिमित्त जागरण-गोंधळाचे आयोजन करण्यात आले. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी या सोहळ्यात सहभागी होत या परंपरेप्रती असलेली आपली श्रद्धा व्यक्त केली. आधुनिकतेच्या प्रवाहात नव्या पिढीपर्यंत महाराष्ट्राच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा पोहोचाव्यात, त्यांचे महत्त्व पुढील पिढ्यांना समजावे आणि हा समृद्ध वारसा असाच पुढे चालत राहावा, या दृष्टीने अशा उपक्रमांना विशेष महत्त्व आहे.

रात्री उशिरा सुरू झालेला जागरण-गोंधळाचा कार्यक्रम पहाटेपर्यंत उत्साहात सुरू होता. पारंपरिक संबळाच्या तालावर सादर झालेल्या नृत्याने आणि भक्तिभावाने नाचवलेल्या दिवट्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. रात्रभर मोठ्या संख्येने उपस्थित राहिलेल्या डोंबिवलीकरांनी देवीच्या जयघोषात सहभागी होत या सोहळ्याचा आनंद घेतला. यावेळी महाराष्ट्रावरील दुष्काळाचे संकट दूर व्हावे, शेतकरी बांधवांच्या जीवनात सुख-समृद्धी यावी आणि राज्यातील प्रत्येक नागरिकाला सुख, शांती व समाधान लाभावे, यासाठी देवीच्या चरणी साकडे घालण्यात आले.

यंदा राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे भान राखत नेहमीचा रासरंग दांडिया महोत्सव रद्द करून शारदीय नवरात्रोत्सव साधेपणाने, मात्र तितक्याच भक्तिभावाने साजरा करण्यात आला. नवकुंडात्मक सहस्रचंडी महायाग, भजन, हरिपाठ, भक्तिसंगीत आणि विविध पारंपरिक सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून सनातन संस्कृतीचा जागर करण्यात आला. जागरण-गोंधळाच्या आयोजनाने या उत्सवाची सांगता पारंपरिक धार्मिक विधी आणि सामूहिक भक्तिभावात झाली.

भक्ती, परंपरा आणि संस्कृतीचा वारसा जपत डोंबिवलीकरांच्या उत्स्फूर्त सहभागात पार पडलेल्या या जागरण-गोंधळाने शारदीय नवरात्रोत्सवाची सांगता मंगलमय वातावरणात झाली.








डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशन, पनवेल, भारतीय बौद्ध महासभा, बौद्धजन पंचायत समिती, बौद्ध धम्म प्रचार-प्रसार समिती आणि त्रिरत्न बौद्ध महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळ्यात भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील, सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार, संस्था संघटनांचे पदाधिकारी, यांच्यासह अनेक भीम अनुयायांनी उपस्थित राहून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. यावेळी उपस्थितांनी भगवान गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना उजाळा देत समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या मूल्यांप्रती आपली बांधिलकी व्यक्त केली.

संकल्प दांडिया २०२६

















## संकल्प दांडियात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती

**जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, मंत्री नितेश राणे, खासदार नरेश म्हस्के आणि कलाकारांनी घेतला दांडियाचा आनंद**

संकल्प प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शारदीय नवरात्रोत्सव २०२६ अंतर्गत संकल्प चौक येथे सुरू असलेल्या 'संकल्प दांडिया' उत्सवाला सोमवारी विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थिती लावली. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, मंत्री नितेश राणे आणि खासदार नरेश म्हस्के यांनी उत्सवाला भेट देत देवीचे दर्शन घेतले. त्यांच्या उपस्थितीमुळे उत्सवस्थळी विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे संकल्प प्रतिष्ठानच्या वतीने स्वागत करण्यात आले. मंत्री नितेश राणे यांनी श्री जय अंबे माता मंदिरात देवीचे दर्शन घेतले, तर जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनीही देवीचे दर्शन घेऊन दांडिया उत्सवाचा आनंद अनुभवला. खासदार नरेश म्हस्के यांच्या उपस्थितीनेही उत्सवाला रंगत आली. मान्यवरांनी उपस्थितांना भेटून संवाद साधला. या उत्सवात अभिनेत्री दीपाली सय्यद, अभिनेत्री पूजा सावंत आणि अभिनेता अभिजीत खांडकेकर यांनीही उपस्थिती लावली. लोकप्रिय कलाकारांना पाहण्यासाठी दांडिया रसिकांनी उत्सुकता दाखवली. त्यांच्या सहभागामुळे कार्यक्रमात आणखी उत्साह निर्माण झाला.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१